## महाराष्ट्र शासन

क्र. संसाख-२०२०/प्र.क्र.०८/कार्या-२४,
सामान्य प्रशासन विभाग, ६ वा मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दूरध्वनी क्र.०२२- २२८८५२२८
दिनांक :- १६.०९.२०२०

# TENDER NOTICE

# दरपत्रकाबाबतची सूचना ( मुदतवाढ )

सामान्य प्रशासन विभाग (खुद्द), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयीन कामकाजासाठी लागणाऱ्या रिसायकलिंग टोनरचा पुरवठा सन **२०२०-२१ मध्ये** एक वर्षाच्या कालावधीसाठी करण्याकरिता निविदाधारकांकडून स्वतंत्रपणे निविदा ( दरपत्रके ) मागविण्यात आल्या आहेत. दरपत्रकाबाबतच्या अटी व शर्ती तसेच दरपत्रकाचे फॉर्म **“ अ ” व “ ब ”** हे सामान्य प्रशासन विभाग ( कार्यासन क्र.२६ ), ३ रा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२ येथे दि.०१/०९/२०२० पासून उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. फॉर्म फी प्रत्येक फॉर्मसाठी स्वतंत्रपणे रु.१००/- अशी आहे. सदर दरपत्रके भरुन, कार्यासन-२४, सामान्य प्रशासन विभाग, ६ वा मजला, रुम नं.६१२, विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२ येथे दिनांक ०१.०९.२०२० पासून ते दिनांक १५/०९/२०२० रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत जमा करावीत, असे शासनाच्या दिनांक २८.०८.२०२० च्या निविदा सूचनेनुसार यापूर्वी कळविण्यात आलेले आहे.

२. तथापि,रिसायकलिंग टोनरचा पुरवठा करण्याकरिता निविदाधारकांकडून, समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याने व पुरेश्या निविदा प्राप्त न झाल्याने,सदर निविदेच्या सूचनेची मुदत दिनांक २३/०९/२०२० रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.सबब, सर्व दृष्टीने परिपूर्ण भरलेली दरपत्रके **कार्यासन-२४, सामान्य प्रशासन विभाग, ६ वा मजला, मंत्रालय, मुंबई येथे दिनांक २३.०९.२०२० रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत जमा करावीत.** मुदतीनंतर आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.तसेच **शासनाकडे दिनांक १६.०९.२०२० पूर्वी प्राप्त झालेल्या निविदाकांरास पुन्हा निविदा सादर करण्याची आवश्यकता नाही,** याची कृपया नोंद घ्यावी.

( प्रमोद घोलप )
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

दिनांक - १६ /०९/२०२०
ठिकाण - मुंबई